आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -  रात्री ८.०५ वाजता

१० मे २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- हा प्रस्ताव शरद पवार यांनी फेटाळला, जनमत विरोधात असल्यानं अस्वस्थ होऊन मोदी संभ्रम निर्माण करणारी विधानं करत असल्याची टीका

- हरयाणात भाजपा सरकारनं बहुमत गमावलं असल्यानं तिथ राष्ट्रपती राजवट लागू करण्याची काँग्रेसची मागणी

- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर, तिहार तुरुंगातून सुटका

**आणि**

- नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी सचिन अंदुरें आणि शरद कळसकरला जन्मठेप, विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची पुराव्याअभावी सुटका

**<><><><><>**

उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना महायुतीमध्ये सहभागी होण्याचं आमंत्रण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत दिलं. प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात, यासंदर्भातलं वक्तव्य शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. त्या अनुषंगानं मोदी बोलत होते. ते म्हणाले…

**होल्ड  प्रधानमंत्री २**

अनुसूचित जाती-जमाती आणि ओबीसींचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही, याचा पुनरुच्चार मोदी यांनी आज केला.

महाविकास आघाडी आरक्षण SC, ST आणि OBC चे हटवण्यासाठी कार्यरत आहे. आरक्षण वाचवण्याचं आश्वासन आपण गेले कित्येक दिवस देत आहोत. मात्र, काँग्रेस या मुद्द्यावर काहीही बोलायला तयार नसल्याचं ते म्हणाले. राम मंदिराच्या मुद्द्यांवरुन काँग्रेसनं घेतलेल्या भूमिकेवर त्यांनी टीका केली.

मोदी यांनी आज तेलंगणातल्या मेहबुबनगर लोकसभा मतदारसंघातही प्रचारसभा घेतली. ही लोकसभा निवडणूक भारताचं भविष्य ठरवणारी असल्याचं ते या वेळी म्हणाले. काँग्रेस आणि बीआरएस या दोन्ही पक्षांवर मोदी यांनी टीका केली. काँग्रेस आपली आश्वासनं पूर्ण करण्यात अपयशी ठरली असून ती लोकांत फूट पाडण्याचं काम करत असल्याची टीका त्यानी केली.

**<><><><><>**

महायुतीसोबत येण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा प्रस्ताव शरद पवार यांनी फेटाळला आहे. मोदी यांच्याविरोधात जनमत तयार होत आहे. यामुळे ते अस्वस्थ झाले असून संभ्रम निर्माण करणारी विधानं करत असल्याचं पवार म्हणाले. ते आज पुण्यात बातमीदारांशी बोलत होते.

जे देशाच्या हिताचे नाहीत ते आमचे सहकारी असणार नाहीत, असं ते म्हणाले. गांधी-नेहरुंच्या विचारधारेवर आमचा पक्ष चालतो. समाजातल्या सर्व घटकांना एकत्र ठेवून आम्ही काम करतो, त्यामुळं अशा प्रस्तावाला पाठिंबा देता येणार नाही, असं ते म्हणाले.

दिल्ली आणि झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना झालेल्या अटकेवरूनही शरद पवार यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. केंद्र सरकारचा सहभाग असल्याशिवाय ही अटक होऊ शकत नाही. या देशातली संसदीय लोकशाही मोदींमुळे संकटात आली असल्याचा आरोप पवार यांनी केला.

**<><><><>**

तृणमूल काँग्रेस वोट बँकेसाठी बांग्लादेशातून आलेल्या घुसखोरांना पाठिंबा देत असल्याचा आरोप भाजपचे ज्येष्ठ नेते आणि गृहमंत्री अमित शहा यांनी केला आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या नावाखाली सर्वसामान्यांना भडकावल्याचा आरोपही त्यांनी केला. भाजपाचे उमेदवार जगन्नाथ सरकार यांच्या प्रचारासाठी त्यांनी पश्चिम बंगालमध्ये राणाघाट इथं एका प्रचारसभेला संबोधित केलं. संदेशखाली घटनेमागे जो कोणी असेल त्याला शिक्षा होईल,  असं ते म्हणाले.

**<><><><>**

ही निवडणूक देशाच्या विकासासाठी, सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी आणि देशाला महासत्ता बनवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचं, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं बुथ प्रमुखांच्या मेळाव्याला संबोधित करत होते.

**<><><><>**

पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मृत्यूच्या संदर्भात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यावरुन त्यांच्याविरोधात नागपुरात गुन्हा दाखल केला आहे. तसंच भाजपानं वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित केलेल्या वादग्रस्त जाहिराती प्रकरणी प्रदेशाध्यक्ष चं्द्रशेखर बावनकुळे यांच्याविरोधात ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. बारामती लोकसभा मतदारसंघात मतदानाच्या वेळी पैसे वाटप, दमदाटी, आचारसंहिता भंग याप्रकरणी निवडणूक आयोगाच्या आदेशावरुन

४ गुन्हे दाखल झाले आहेत. याशिवाय स्थानिक पोलिसांमध्येही काही गुन्हे दाखल झाल्याची माहिती त्यांनी दिली.

विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांसाठी १० जून रोजी मतदान प्रस्तावित आहे. मात्र शाळांना सुटी असल्यानं हे मतदान शाळा सुरू झाल्यावर घ्यावं, अशी विनंती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला प्राप्त झाली होती. ती आज केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवल्याची माहिती चोकलिंगम यांनी दिली.

**<><><><><>**

हरियाणात भाजपाच्या राज्य सरकारनं बहुमत गमावलं असून इथं राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे. नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत आज ते बोलत होते. तीन अपक्ष आमदारांनी भाजपप्रणीत राज्य सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. त्यामुळे सरकारनं बहुमत गमावलं असून इथं राष्ट्रपती राजवाट लागू करणं योग्य आहे, असं जयराम रमेश म्हणाले. भाजपाचे हरियाणा आणि केंद्रातले दिवस भरत आल्याची टीकाही त्यांनी केली.

**<><><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज जामीन मिळाल्यानंतर तिहार तुरुंगातून त्यांची सुटका झाली आहे. केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून कथित मद्यधोरण प्रकरणात १ जून पर्यंत हंगामी जामीन मंजुर झाला. १ जून रोजी दिल्लीतं मतदान झाल्यानंतर २ जून रोजी त्यांना आत्मसमर्पण करावं लागेल.

लोकसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं मुभा दिली आहे. मात्र त्यांना मुख्यमंत्री कार्यालय आणि दिल्ली सचिवालयात जाता येणार नाही आणि नायब राज्यपालांच्या मंजुरी असल्याशिवाय ते कोणत्याही अधिकृत कागदपत्रांवर स्वाक्षरी करणार नसल्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातले ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी त्यांच्यावर गोळीबार करणाऱ्या सचिन अंदुरें आणि शरद कळसकर यांना पुण्यातल्या विशेष न्यायालयानं जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या दोघांनी गोळी झाडल्याची कबुली दिली होती. तर पुराव्या अभावी डॉ. विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची मुक्तता केली आहे. याप्रकरणात UAPA अंतर्गत लावलेले आरोपही न्यायालयानं फेटाळले.

दोषी असलेल्या दोघांना शिक्षा देण्याच्या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी उच्च न्यायालयात जाणार असल्याचं दाभोलकर यांची कन्या मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात सकाळी दाभोळकर यांची हत्या झाली होती.

**<><><><><>**

आंतर सेवा संघटन (आज्ञा, नियमन आणि अनुशासन ) कायद्याची अधिसूचना जारी करण्यात आली. गेल्या वर्षी, संसदेच्या पावसाळी अधिवेशनात दोन्हीही सभागृहात हे विधेयक मंजूर करण्यात आलं होतं.

हा कायदा आंतर-सेवा संघटनांचे कमांडर-इन-चीफ आणि ऑफिसर्स-इन-कमांड यांना सेवा कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, शिस्त आणि प्रशासनाची प्रभावी देखभाल करण्यासाठी, वैयक्तिक पातळीवर असलेल्या सेवेशी निगडीत शर्तींचा अडथळा न आणता अधिकार देईल. यामुळे प्रकरणांचा जलद निपटारा करणं शक्य होईल. तसंच यामुळे सशस्त्र दलातल्या कर्मचाऱ्यांच्या एकात्मिकरणामध्ये मदत होईल.

**<><><><><>**

आरोग्यसेवा क्षेत्रात वेळ ही अधिक महत्त्वाची आहे कारण उपचाराला उशीर झाला तर जीव जाऊ शकतो. त्यामुळे तज्ज्ञ डाॅक्टरांनी आपत्कालीन रुग्णांच्या बाबतीत संवेदनशील असणं आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. वैद्यकीय विज्ञान राष्ट्रीय परीक्षा मंडळाच्या २२व्या दीक्षांत सोहळ्याला त्यांनी आज संबोधित केलं. तेव्हां त्या बोलत होत्या. राष्ट्रपतींनी डॉक्टरांना त्वरित, संवेदनशील आणि स्वस्त आरोग्यसेवा याकडे लक्ष देण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान सोमवारी होणार आहे. मतदान होणार असलेल्या भागात उष्णतेची लाट नसल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे. या फेरीत उत्तर प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, आंध्र प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीर या नऊ राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या लोकसभेच्या एकूण ९६ जागांसाठी मतदान होणार आहे. पश्चिम राजस्थान वगळता भारताच्या कोणत्याही भागात उष्णतेची लाट नाही. तसंच पश्चिम राजस्थानमधली

उष्णतेची लाट उद्यापासून कमी होणार असल्याचं भारतीय हवामान खात्याचे शास्त्रज्ञ आर के जेनामणी म्हणाले.

**<><><><><>**

छत्तीसगडमधे, बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत १३ माओवादी मारले गेले. गंगालूर भागात पेडिया गावाजवळच्या जंगलात जिल्हा राखीव रक्षक आणि विशेष कृती दलाचं संयुक्त पथक शोधमोहिम राबवत असताना ही चकमक घडली. ही चार तास चालू होती. त्यात या पथकातले दोन जवानही जखमी झाले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. चेन्नई सुपर किंग्ज संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सच्या ८ षटकात बिनबाद ७९ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण ‘ठाणे’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

संदेशखाली येथील महिला तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या धमकीमुळे त्यांच्या तक्रारी मागे घेणार नाहीत याची काळजी घेतली जावी अशी विनंती आज

राष्ट्रीय महिला आयोगानं निवडणूक आयोगाला केली आहे. संदेशखालीतल्या महिलांना सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांची तक्रार मागे घेण्यासाठी धमकावलं जात आहे. तसंच त्यांच्यावर दबाव आणला जात आहे असं निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रात राष्ट्रीय महिला आयोगानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**